महाराष्ट्र शासन

क्र. संकीर्ण २०१०/(३१/१०)/माशि-१.
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक ६ मार्च २०१०.

प्रति,

१) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), म.रा.,पुणे.
२) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
३) शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,

विषय :- संस्थेमध्ये वाद असल्यास शाळेच्या मुख्याध्यापकांची वेतननिश्चितीप्रमाणेच वेतनवाढी, सेवानिवृत्तीवेतनासंबधी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना अधिकार देण्याबाबत.

संस्थेमध्ये वाद असल्यास व मुख्याध्यापकांची वेतननिश्चिती संस्थेमार्फत होणे शक्य नसल्यास अशा शाळांमधील मुख्याध्यापकांची वेतननिश्चिती शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी करण्याबाबत शासन पत्र दि. २१ जानेवारी २०१० अन्वये सर्व क्षेत्रीय अधिका-यांना कळविण्यात आले आहे. मुख्याध्यापकांच्या वेतननिश्चिती प्रकरणांप्रमाणेच त्यांच्या वेतनवाढी, वरिष्ठश्रेणी, निवडश्रेणी तसेच निवृत्तीवेतनासंदर्भातील प्रकरणे, संबंधित संस्थेत वाद असल्यामुळे संस्थेमार्फत होणे शक्य नसल्यास यासंदर्भातदेखील निर्णय घेण्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना अधिकार राहतील.

सदर संदर्भ महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्रमांक- 201003061930170001 आहे.

सुवर्णा खरात

( डॉ.सुवर्णा सि. खरात )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :
अवर सचिव (माशि-२), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,मुंबई
कक्ष अधिकारी (माशि-३), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय,मुंबई
निवड नस्ती, माशि-१

**मुख्याध्यापकाची वेतननिश्चिती/वेतनश्रेणी/निवृत्तीवेतन**
**विषयक प्रस्ताव तयार करणेसंबंधीचे अधिकार**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना प्रदान करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
शासन परिपत्रक, क्रमांक:संकीर्ण-१९१०/(३४९/१०)/प्राशि-३
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०९ ऑगस्ट, २०१०.

**परिपत्रक :-** महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियम अधिनियम १९७७ चे अनुषंगाने नियमावली १९८१ तयार करण्यात आली असून, त्यामधील नियम ३९ अनुसार मुख्याध्यापकाची नेमणूक संबंधित शाळेच्या व्यवस्थापनाकडून होते. याच नियमावलीच्या नियम (८) प्रमाणे मुख्याध्यापकांना वेतनश्रेणी लागू करणे, वेतनवाढी लागू करणे, वरिष्ठ / निवड श्रेणी लागू करणे, व सेवानिवृत्ती विषयक प्रकरणे व्यवस्थापनाव्दारे तयार करून मान्यतेसाठी संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात येतात. म्हणजेच या नियमांतर्गत शाळेच्या व्यवस्थापनास केवळ प्रस्ताव तयार करण्याचे अधिकार आहेत. मात्र प्रस्ताव मान्य करण्याचे अधिकार हे शिक्षणाधिकारी व त्यांचे वरील शासकीय प्रशासकीय स्तरावरील आहेत. तथापि, संस्थेच्या व्यवस्थापन किंवा व्यवस्थापनातील अंतर्गत वाद किंवा मुख्याध्यापक यांचेमध्ये अंतर्गत वाद निर्माण झाल्यास मुख्याध्यापकास वेतनश्रेणी लागू करणे, वेतनवाढी लागू करणे, वरिष्ठ/निवड श्रेणी लागू करणे, व सेवानिवृत्ती विषयक प्रकरणे व्यवस्थापनाव्दारे तयार केली जात नाहीत, अथवा टाळाटाळ केली जाते. अशावेळी मुख्याध्यापकाची आर्थिक कुचंबना होते व त्याचा परिणाम त्याच्या कार्यक्षमतेवरही होतो. परिणामी भविष्यात प्रशासकीय अडचणी निर्माण होण्याची शक्यता असते.

२. ही बाब विचारात घेवून, विभागांतर्गत माध्यमिक शाखेकडून पत्र क्रमांक संकीर्ण २०१०/(३१/१०)/माशि-१, दिनांक २१ जानेवारी,२०१० व दिनांक ६ मार्च, २०१० च्या पत्रान्वये शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये वाद असल्यास, मुख्याध्यापकाची वेतननिश्चिती / निवृत्तीवेतन विषयक प्रकरणे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचे स्तरावरून सादर करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. याच धर्तीवर प्राथमिक स्तरावर सुध्दा शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये वाद असल्यास, खालील अटींच्या अधिन राहून मुख्याध्यापकाची वेतननिश्चिती/वेतनश्रेणी/निवृत्तीवेतन विषयक प्रकरणे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे स्तरावरून सादर करण्याचे अधिकार या आदेशान्वये प्रदान करण्यात येत आहेत.

(अ) संबंधित संस्थेचे व्यवस्थापन किंवा व्यवस्थापनातील अंतर्गत वाद या संदर्भात मा. न्यायालयात याचिका दाखल झालेली असावी. **किंवा,**

(ब) संबंधित संस्थेचे व्यवस्थापन व मुख्याध्यापक यांचेमध्ये अंतर्गत वाद निर्माण झाले असल्यास या संबंधीची लेखी तक्रार विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेकडे केलेली असावी. **किंवा,**

(क) संबंधित संस्थेचे व्यवस्थापन व मुख्याध्यापक यांचेमध्ये अंतर्गत वाद यामध्ये खुद्द मुख्याध्यापक जबाबदार नसावेत.

३. हे शासन परिपत्रक शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक :- **२०१००८१०१२२३२७००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( आ. भ. जगताप )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

(१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे-१,
(२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे-१,
(३) सर्व विभागीय आयुक्त, कोकण विभाग, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर,
(४) सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, लातूर, कोल्हापूर व नागपूर,

महाराष्ट्र शासन

क्रमांक:-संकीर्ण-२०१०/(३१/१०)/माशि-१
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: २१ जानेवारी, २०१०.

प्रति,

१. शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.)
महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.

३. सर्व शिक्षणाधिकारी (माध्य.)

विषय :- संस्थेमध्ये वाद असल्यास शाळेच्या मुख्याध्यापकांची वेतन निश्चिती संबंधीत शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी करणेबाबत.

संस्थांमध्ये वाद असल्यास शाळेतील प्रशासकीय कामकाजावर त्याचा निश्चितच विपरीत परिणाम होत असतो. शाळेतील कार्यरत कर्मचा-यांच्या सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती ही संबंधीत शाळेच्या मुख्याध्यापकांमार्फत करण्यात येते. मुख्याध्यापकांची सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन निश्चिती ही संबंधीत संस्थेमार्फत करण्यात येत असते. मात्र ज्या संस्थांमध्ये वाद आहे अशा शाळांमध्ये मुख्याध्यापकांची वेतन निश्चिती होऊ शकत नसल्याबाबतच्या तक्रारी शासनास प्राप्त झालेल्या आहेत. या तक्रारी विचारात घेऊन शासन स्तरावरुन आपणास आदेशीत करण्यात येत आहे की ज्या संस्थांमध्ये वाद आहे अशा ठिकाणी मुख्याध्यापकांची वेतन निश्चिती संस्थेमार्फत होणे शक्य नसल्यास संबंधीत शिक्षणाधिकारी (माध्य.) यांनी सदर वेतन निश्चिती करावी.

२. सदर शासन पत्र शासनाच्या संकेतस्थळावर ( www.maharshtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा सांकेतांक क्रमांक- २०१००१२११६४३००१ असा आहे.

(डॉ.सुवर्णा खरात)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रत-

१. अवर सचिव (माशि-२),शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. कक्ष अधिकारी (माशि-३), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

३. निवडनस्ती-माशि-१